महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती
Regional Referral Services Hospital, Amravati
वैद्यकीय अधीक्षक कार्यालय

जावक क्र.: विसंसेरुअम/दरपत्रके/खरेदी/अटीवशर्ती/ ११८९५ /२०२६ दिनांक: १२/११/२०२६

सूचना

ऑन्कोलॉजी औषधांच्या खरेदीबाबत – Corregendum for RRSH/Website/E-Quotation/11848/26, Dated:09/11/2026

पुढीलप्रमाणे अटी व शर्ती ह्या दरपत्रक मजकुराचा भाग असतील

अटी व शर्ती

१. सर्व २८५ औषधांचे दर सादर करणे अनिवार्य :

१.१ सदर दरपत्रकासोबत जोडलेल्या एकूण २८५ ऑन्कोलॉजी औषधांच्या यादीतील प्रत्येक औषधासाठी दर सादर करणे पुरवठादारास अनिवार्य राहील. (हमीपत्र व अटी-शर्ती मान्य असल्याबाबतचे घोषणापत्र Envelope -1 (तांत्रिक लिफाफा) मध्ये सादर करणे अनिवार्य राहील, पुरवठादारानी सदर हमीपत्र सादर न केल्यास त्यांचा Envelope -2 (आर्थिक लिफाफा) उघडण्यास ते अपात्र घोषित करण्यात येईल.

१.२ पुरवठादाराने सर्व २८५ औषधांसाठी औषधाचे नाव, Generic Name, Strength, Dosage Form, Pack Size आणि दर प्रती tablet/vial/unit नुसार नमूद करावे.

१.३ कोणत्याही औषधासमोर दर रिक्त ठेवणे, दर उपलब्ध नसल्याचे नमूद करणे, नंतर दर सादर करण्याची अट ठेवणे किंवा निवडक औषधांचेच दर सादर करणे मान्य राहणार नाही.

१.४ सर्व २८५ औषधांचे दर पूर्णपणे सादर न करणारे दरपत्रक अपूर्ण समजण्यात येईल. अशा दरपत्रकाचा विचार निविदेतील पात्रता अटी व लागू खरेदी नियमांनुसार करण्यात येईल.

१.५ पुरवठादाराने दर सादर केलेल्या सर्व औषधांचा पुरवठा करण्याची क्षमता, अधिकृत खरेदी स्त्रोत व आवश्यक वैधानिक परवाने असल्याची खात्री करावी.

२. अनुदान उपलब्धतेनुसार देयक अदा करणे व पुरवठा खंडित न करणे :

२.१ सदर औषधांची खरेदी रुग्णालयास प्राप्त होणाऱ्या मंजूर अनुदानातून/निधीतून करण्यात येईल. संबंधित अनुदान किंवा निधी उपलब्ध झाल्यानंतर आणि आवश्यक प्रशासकीय व लेखा पडताळणी पूर्ण झाल्यानंतर नियमानुसार देयक अदा करण्यात येईल.

२.२ अनुदान किंवा निधी उपलब्ध होण्यास विलंब झाल्यास देयक अदा करण्यास विलंब होऊ शकतो. अशा परिस्थितीत केवळ अनुदान/निधी उपलब्ध नसल्याचे कारण देऊन पुरवठादाराने रुग्णालयास औषधांचा पुरवठा बंद करणे, थांबविणे किंवा नाकारण्याची कार्यवाही करता येणार नाही.

२.३ पुरवठादाराने मंजूर दरकरार व रुग्णालयाकडून प्राप्त अधिकृत Purchase Order/Supply Order नुसार औषधांचा नियमित व अखंडित पुरवठा सुरू ठेवणे बंधनकारक राहील.

२.४ पुरवठादाराने देयकासंबंधी कोणतीही अडचण असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यास लेखी कळवावे. परंतु त्याआधारे रुग्णांच्या उपचारांसाठी आवश्यक औषधांचा पुरवठा एकतर्फी खंडित करता येणार नाही.

२.५ रुग्णालयाकडून प्राप्त पूर्ण व योग्य बिलांची पडताळणी करून निधी उपलब्धतेनुसार आणि लागू वित्तीय नियमांनुसार देयक अदा करण्यात येईल. रुग्णालयाकडूनही प्राप्त बिलांची आवश्यक कार्यवाही व निधी उपलब्धतेसाठी पाठपुरावा वेळेत करण्यात येईल.

३. दर सहा महिन्यांसाठी निश्चित व अंतिम राहतील — दरवाढ मान्य नाही :

३.१ सदर दरपत्रकांतर्गत पुरवठादाराने सादर केलेले व रुग्णालयाने मंजूर केलेले दर कराराच्या सहा महिन्यांच्या संपूर्ण कालावधीसाठी निश्चित व अंतिम राहतील.

३.२ बाजारभावात वाढ, कच्च्या मालाच्या किमतीत वाढ, उत्पादन खर्च, वाहतूक खर्च, चलनातील बदल, उत्पादक कंपनीकडून दरवाढ किंवा इतर कोणतेही व्यावसायिक कारण पुढे करून **पुरवठादारास मंजूर दरात वाढ मागता येणार नाही.**

३.३ मंजूर दरानुसारच संपूर्ण सहा महिन्यांच्या कालावधीत औषधांचा पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.

३.४ कराराच्या कालावधीत पुरवठादाराने सादर केलेल्या व मंजूर केलेल्या दरात कोणतीही एकतर्फी वाढ लागू करता येणार नाही.

३.५ औषधांच्या किंमतीबाबत NPPA किंवा अन्य सक्षम वैधानिक प्राधिकरणाकडून कायदेशीररीत्या लागू होणारे किंमत नियंत्रण आदेश किंवा बदल असल्यास त्यांचे पालन करणे बंधनकारक राहील. अशा वैधानिक बदलांच्या बाबतीत लागू कायदेशीर मर्यादेनुसार कार्यवाही करण्यात येईल. मात्र बाजारभावातील सामान्य वाढीच्या कारणास्तव दरवाढ मागता येणार नाही.

४. दरपत्रकाचा कालावधी :

४.१ सदर दरपत्रकांतर्गत मंजूर दरांचा कालावधी करारनामा/दरमंजुरी प्रभावी झाल्याच्या दिनांकापासून **सहा महिने** राहील.

४.२ सहा महिन्यांच्या कालावधीत रुग्णालयाकडून आवश्यकतेनुसार वेळोवेळी Purchase Order/Supply Order देण्यात येतील.

४.३ दरकराराचा कालावधी संपल्यानंतर पुढील खरेदीसाठी नव्याने दर निश्चितीची प्रक्रिया राबविण्यात येईल. मुदतवाढ आपोआप लागू होणार नाही.

५. औषधांची मागणी व पुरवठ्याचे प्रमाण :

५.१ सदर २८५ औषधांची मागणी रुग्णालयातील प्रत्यक्ष रुग्णसंख्या, रुग्णांच्या उपचारांची आवश्यकता, संबंधित विभागाकडून प्राप्त मागणीपत्रे आणि उपलब्ध औषधसाठा यानुसार वेळोवेळी निश्चित करण्यात येईल.

५.२ दरपत्रकातील प्रमाण हे अंदाजित मागणीसाठी असून, रुग्णालयावर कोणत्याही निश्चित प्रमाणात औषधे खरेदी करण्याचे बंधन राहणार नाही.

५.३ रुग्णालयाकडून पुरवठादारास वेळोवेळी देण्यात येणाऱ्या अधिकृत Purchase Order/Supply Order मध्ये नमूद केलेल्या औषधांचे नाव, प्रमाण, पॅकिंग, मंजूर दर व पुरवठ्याचा कालावधी यानुसार संपूर्ण पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.

५.४ रुग्णालयाकडून देण्यात आलेल्या अधिकृत पुरवठा आदेशातील संपूर्ण प्रमाणाचा पुरवठा करणे अनिवार्य राहील. **पुरवठादारास स्वतःच्या सोयीनुसार औषधांचे प्रमाण कमी करणे, अंशतः पुरवठा करणे किंवा पुरवठा नाकारणे मान्य राहणार नाही.** अंशतः पुरवठा केवळ रुग्णालयाच्या सक्षम अधिकाऱ्याच्या लेखी संमतीने स्वीकारला जाईल.

५.५ प्रत्यक्ष पुरवठा आदेशानुसार प्राप्त व स्वीकारलेल्या औषधांचेच देयक अदा करण्यात येईल. मागणी नसलेल्या औषधांच्या अंदाजित प्रमाणाबाबत पुरवठादारास कोणताही आर्थिक दावा करता येणार नाही.

५.६ रुग्णांच्या उपचारांची गरज लक्षात घेऊन तातडीची मागणी करण्यात आल्यास पुरवठादाराने अशा आदेशास प्राधान्य देऊन निर्धारित कालावधीत औषधे उपलब्ध करून द्यावीत.

६. नियमित व अखंडित पुरवठा :

६.१ पुरवठादाराने मंजूर दरकरारानुसार रुग्णालयास आवश्यक असलेल्या औषधांचा नियमित व अखंडित पुरवठा करणे बंधनकारक राहील.

६.२ सामान्य औषधांसाठी Purchase Order प्राप्त झाल्यापासून **जास्तीत जास्त २ दिवसांत पुरवठा** करावा. तातडीच्या / **जीवनावश्यक औषधांसाठी तात्काळ पुरवठा** करणे आवश्यक राहील.

६.३ एखाद्या औषधाचा पुरवठा उत्पादकाकडून बंद झाल्यास, बाजारात उपलब्धता नसल्यास किंवा इतर अपरिहार्य परिस्थिती उद्भवल्यास पुरवठादाराने त्याबाबत त्वरित लेखी माहिती व संबंधित पुरावे रुग्णालयास सादर करावेत.

६.४ कोणत्याही **औषधाचा पुरवठा कायमस्वरूपी बंद करावयाचा असल्यास किमान ६० दिवस आधी लेखी सूचना देणे** आवश्यक राहील. तथापि, औषधावरील वैधानिक बंदी किंवा नियामक निर्बंध असल्यास तत्काळ माहिती देणे बंधनकारक राहील.

६.५ रुग्णालयाच्या पूर्व लेखी परवानगीशिवाय मंजूर औषधाऐवजी दुसरे ब्रँड, उत्पादक, Strength, Dosage Form किंवा Pack Size पुरवता येणार नाही.

७. औषधांची गुणवत्ता व वैधानिक कागदपत्रे :

७.१ पुरवठादाराकडे वैध Wholesale Drug Licence व लागू कायद्यानुसार आवश्यक असलेले इतर परवाने असणे आवश्यक राहील.

७.२ औषधांचा पुरवठा Drugs and Cosmetics Act, 1940, Drugs Rules, 1945 व लागू सुधारित तरतुदींनुसार असावा.

७.३ औषधे परवानाधारक उत्पादकाकडून किंवा अधिकृत वितरकाकडून खरेदी केलेली असावीत. आवश्यकतेनुसार Manufacturer Authorization सादर करणे बंधनकारक राहील.

७.४ प्रत्येक औषधाच्या पॅकिंगवर **Batch Number, Manufacturing Date, Expiry Date, MRP, Manufacturer Name** व आवश्यक वैधानिक तपशील नमूद असावेत.

७.५ पुरवठ्याच्या वेळी औषधाच्या एकूण मान्य **शेल्फ लाइफपैकी शक्यतो किमान ५०% शिल्लक असावी**. त्यापेक्षा कमी शेल्फ लाइफ असलेले औषध केवळ रुग्णालयाच्या सक्षम अधिकाऱ्याच्या पूर्व लेखी मंजुरीने स्वीकारता येईल.

७.६ औषधे मूळ सीलबंद उत्पादक पॅकिंगमध्येच पुरवावीत. तुटलेली, उघडी, खराब, बनावट, मुदतबाह्य किंवा संशयास्पद औषधे स्वीकारली जाणार नाहीत.

७.७ तापमान नियंत्रित ठेवण्याची आवश्यकता असलेल्या औषधांसाठी आवश्यक Cold Chain व तापमान नोंदी पुरवठादाराने उपलब्ध करून द्याव्यात.

७.८ औषधांच्या गुणवत्तेबाबत संशय असल्यास रुग्णालयास **नमुना तपासणीसाठी पाठविण्याचा अधिकार** राहील. नमुना तपासणीत औषध निकृष्ट दर्जाचे किंवा मानकांनुसार नसल्याचे आढळल्यास संबंधित औषध बदलून देणे किंवा त्याची किंमत परत करणे पुरवठादारास बंधनकारक राहील.

७.९ निकृष्ट, बनावट किंवा मानकांनुसार नसलेल्या औषधांमुळे उद्भवणाऱ्या कायदेशीर व आर्थिक जबाबदारीबाबत लागू कायदे व करारातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

७.१० औषध पुरवठा करतेवेळी पुरवठादरानी NABL Report , Drug Analysis Report सादर करणे अनिवार्य राहील.

८. दरपत्रक सादर करण्याची पद्धत व दरांची वैधता :

८.१ प्रत्येक औषधासाठी स्वतंत्र दर नमूद करणे आवश्यक राहील.

८.२ पुरवठादाराने सादर केलेले दर हे सर्व लागू खर्चांसह अंतिम दर असावेत. नंतर कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारता येणार नाही, जोपर्यंत दरपत्रकात व मंजूर करारात त्याची स्पष्ट तरतूद नाही.

८.३ पुरवठादाराने सादर केलेल्या दरांची बाजारभाव, मागील खरेदी दर, उपलब्ध शासकीय दर व इतर विश्वसनीय स्रोतांच्या आधारे वाजवीपणा तपासण्याचा अधिकार रुग्णालयास राहील.

८.४ दर अवास्तव कमी किंवा जास्त असल्यास रुग्णालयास स्पष्टीकरण मागविण्याचा अधिकार राहील.

९. दंडात्मक तरतुदी व करार समाप्ती :

९.१ पुरवठा आदेशानुसार निर्धारित कालावधीत औषधांचा पुरवठा न केल्यास पुरवठादाराकडून लेखी स्पष्टीकरण मागविण्यात येईल.

९.२ योग्य कारणाशिवाय पुरवठा न केल्यास करारातील तरतुदी व लागू नियमांनुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

९.३ पुरवठादाराने औषधांचा **पुरवठा न केल्यामुळे रुग्णालयास पर्यायी स्रोताकडून औषधे खरेदी करावी लागल्यास, लागू करारातील तरतुदी व कायदेशीर प्रक्रिया पाळून अतिरिक्त खर्चाची वसुली करण्याचा अधिकार रुग्णालयास राहील.**

११.४ वारंवार पुरवठा खंडित करणे, निकृष्ट औषधे पुरविणे, चुकीचे दर आकारणे, बनावट कागदपत्रे सादर करणे किंवा करारातील महत्त्वाच्या अटींचा भंग करणे अशा बाबींमध्ये कारणे दाखवा नोटीस देऊन नियमानुसार करार समाप्ती व सुरक्षा ठेव जप्तीची कार्यवाही करता येईल.

११.५ कोणतीही दंडात्मक कारवाई करण्यापूर्वी पुरवठादारास त्याचे म्हणणे मांडण्याची योग्य संधी देण्यात येईल. औषध गुणवत्ता किंवा रुग्ण सुरक्षिततेस गंभीर धोका असल्यास तातडीची प्रतिबंधात्मक कार्यवाही करता येईल.

१२. पुरवठादाराने सादर करावयाची कागदपत्रे :

१२.१ वैध Wholesale Drug Licence.

१२.२ PAN Card व GST Registration Certificate.

१२.३ फर्म नोंदणी प्रमाणपत्र/Shop Act किंवा लागू नोंदणी प्रमाणपत्र.

१२.४ उत्पादक अधिकृतता पत्र (Manufacturer Authorization), लागू असल्यास.

१२.५ औषधांचा अधिकृत पुरवठा स्रोत व आवश्यक अनुभवाची कागदपत्रे.

१२.६ बँक खाते तपशील व रद्द केलेला धनादेश.

१२.७ आवश्यकतेनुसार गुणवत्ता प्रमाणपत्रे व इतर वैधानिक कागदपत्रे.

१२.८ सर्व २८५ औषधांसाठी दर सादर केल्याचे व मंजूर दरांनुसार पुरवठा करण्याची तयारी असल्याचे हमी पत्र/घोषणापत्र.

१३. इतर सर्वसाधारण अटी :

१३.१ पुरवठादाराने औषधांच्या किंमतीत लागू कायदेशीर कपात किंवा किंमत नियंत्रण आदेशामुळे किंमत कमी झाल्यास सुधारित लागू किंमत रुग्णालयास आकारावी.

१३.२ पुरवठादाराने दरपत्रकात नमूद केलेल्या औषधांचे नाव, Strength, Dosage Form, Pack Size किंवा उत्पादक बदलण्यापूर्वी रुग्णालयाची लेखी परवानगी घेणे आवश्यक राहील.

१३.३ पुरवठादाराने मंजूर दर व पुरवठा जबाबदारी रुग्णालयाच्या पूर्व लेखी परवानगीशिवाय अन्य संस्थेकडे हस्तांतरित करता येणार नाही.

१३.४ पुरवठादाराने रुग्णालयाच्या अधिकृत प्रतिनिधींना औषधांच्या गुणवत्ता, साठा, स्रोत व पुरवठा नोंदींची पडताळणी करण्यासाठी आवश्यक सहकार्य करावे.

१३.५ पुरवठादाराने सादर केलेली सर्व माहिती खरी व अचूक असणे आवश्यक राहील. चुकीची किंवा दिशाभूल करणारी माहिती आढळल्यास नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१३.६ कोणत्याही विवादाच्या बाबतीत प्रथम परस्पर चर्चेद्वारे तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल. तोडगा न निघाल्यास लागू कायदे व सक्षम न्यायिक क्षेत्राधिकारानुसार कार्यवाही करण्यात येईल.

१३.७ सदर दरपत्रक व त्याअंतर्गत होणारी खरेदी महाराष्ट्र शासनाचे लागू शासन निर्णय, खरेदी नियम, वित्तीय नियम व औषधविषयक वैधानिक तरतुदींच्या अधीन राहील. शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या लागू सुधारित आदेशांचे पालन करणे बंधनकारक राहील.

वैद्यकीय अधिक्षक
विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय,अमरावती

प्रतिलिपी- माहितीस्तव सविनय सादर

१) मा. उपसंचालक, आरोग्य सेवा अकोला मंडळ, अकोला

Note : It is compulsory to Submit This Declaration On the Letter Head Of Tenderer In An Envelope - 1 (Technical Documents), Those Who Not Submit This Declaration, Are Consider As Not Eligible

हमीपत्र व अटी-शर्ती मान्य असल्याबाबतचे घोषणापत्र

(Undertaking / Declaration by the Bidder)

प्रति,

मा. वैद्यकीय अधीक्षक,

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय,

अमरावती.

विषय: ऑन्कोलॉजी विभागासाठी २८५ औषधांच्या दरपत्रकासंदर्भात सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र सादर करणे.

मा. महोदय,

आम्ही खाली सही करणारे मे. _____, पत्ता _____, सदर रुग्णालयामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या ऑन्कोलॉजी विभागासाठी आवश्यक २८५ औषधांच्या दरपत्रक प्रक्रियेमध्ये सहभागी होत असून, त्यासंदर्भात खालीलप्रमाणे हमी व घोषणापत्र सादर करीत आहोत.

१. सदर दरपत्रकातील एकूण २८५ औषधांचे दर आम्ही आर्थिक लिफाफ्यामध्ये (Financial Bid) नमूद केलेले असून, सर्व २८५ औषधांसाठी दर सादर केलेले आहेत. कोणत्याही औषधाचा दर रिक्त ठेवलेला नाही किंवा नंतर सादर करण्याची अट ठेवलेली नाही, याची आम्ही खात्री देत आहोत.

२. रुग्णालयामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या दरपत्रकातील सर्व अटी व शर्ती, तांत्रिक तपशील, औषधांची गुणवत्ता, पुरवठ्याचा कालावधी, दरांची वैधता व इतर सर्व तरतुदी आम्हाला पूर्णपणे मान्य आहेत.

३. रुग्णालयाकडून मंजूर करण्यात आलेल्या दरांनुसार सहा महिन्यांच्या संपूर्ण करार कालावधीत औषधांचा पुरवठा करण्यास आम्ही बांधील राहू. बाजारभावात वाढ, कच्च्या मालाच्या किमतीत वाढ, उत्पादन खर्च, वाहतूक खर्च किंवा उत्पादक कंपनीकडून दरवाढ झाल्याचे कारण देऊन मंजूर दरांमध्ये कोणतीही वाढ मागणार नाही किंवा त्या कारणास्तव औषधांचा पुरवठा बंद/खंडित करणार नाही.

४. रुग्णालयास प्राप्त होणारे अनुदान/निधी उपलब्ध होण्यास विलंब झाल्यामुळे देयक अदा करण्यास विलंब होऊ शकतो, याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. केवळ अनुदान/निधी उपलब्ध न झाल्याचे किंवा देयक प्रलंबित असल्याचे कारण देऊन आम्ही औषधांचा पुरवठा बंद, खंडित किंवा नाकारण्याची कार्यवाही करणार नाही. रुग्णालयाकडून प्राप्त अधिकृत Purchase Order/Supply Order नुसार औषधांचा नियमित व अखंडित पुरवठा करू.

५. रुग्णालयाकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या अधिकृत Purchase Order/Supply Order मध्ये नमूद केलेल्या औषधांचे नाव, प्रमाण, मंजूर दर व पुरवठ्याचा कालावधी यानुसार संपूर्ण औषधांचा पुरवठा करणे आम्हाला बंधनकारक राहील. रुग्णालयाच्या प्रत्यक्ष गरजेनुसार मागणीमध्ये बदल होऊ शकतो, याची आम्हाला जाणीव आहे. प्रत्यक्ष पुरवठा आदेशानुसार प्राप्त व स्वीकारलेल्या औषधांचेच देयक अदा होईल, हे आम्हाला मान्य आहे.

६. कोणत्याही कारणास्तव आम्ही मंजूर दरांनुसार औषधांचा पुरवठा करण्यास असमर्थ ठरलो किंवा बाजारभावातील वाढ, अनुदान/निधीची अनुपलब्धता अथवा देयक प्रलंबित असल्याचे कारण देऊन पुरवठा खंडित केला, तर त्याची संपूर्ण जबाबदारी आमची राहील.

७. वरीलप्रमाणे नमूद तसेच खुल्या सूचनेनुसार नमूद, करारातील अटींचा भंग केल्यास किंवा पुरवठा जाणीवपूर्वक बंद/खंडित केल्यास रुग्णालयाचे कार्यालय प्रमुख/सक्षम प्राधिकारी यांना लागू शासन निर्णय, खरेदी नियम व नियमानुसार आवश्यक नोटीस व सुनावणीची प्रक्रिया पूर्ण करून आमच्या फर्मविरुद्ध दंडात्मक कार्यवाही करणे, करार समाप्त करणे तसेच आवश्यकतेनुसार काळ्या यादीत (Blacklisting/Debarment) समाविष्ट करण्याची कार्यवाही करण्याचा अधिकार राहील, याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. अशा कार्यवाहीबाबत लागू नियमांनुसार निर्णय घेण्यात येईल, हे आम्हाला मान्य आहे.

८. आम्ही सादर केलेली सर्व माहिती, कागदपत्रे, परवाने व घोषणापत्रे खरी व वैध असल्याची खात्री देत आहोत. चुकीची किंवा दिशाभूल करणारी माहिती आढळल्यास नियमानुसार होणारी कार्यवाही आम्हाला मान्य राहील.

९. सदर दरपत्रकाच्या सर्व अटी व शर्तींचे पालन करून रुग्णालयास आवश्यक असलेल्या औषधांचा नियमित, वेळेत व अखंडित पुरवठा करण्यास आम्ही स्वेच्छेने सहमत आहोत.

वरील सर्व बाबी आम्ही पूर्णपणे वाचून, समजून व कोणत्याही दबावाशिवाय मान्य करून हे हमीपत्र आमच्या अधिकृत लेटरहेडवर सादर करीत आहोत.

दिनांक: _____

ठिकाण: _____

अधिकृत स्वाक्षरी: _____

फर्मचे नाव: _____

फर्मचा शिक्का